# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक ०१.०८.२०२६ शनिवार**

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे गणेशपेठ :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०१.०८.२०२६ चे १२.५५ वा. चे सुमारास, गणेशपेठ पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, धोबी घाट, करबला परिसरात एक सुमित नावाचा इसम हातात शस्त्र घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम दिसून आल्याने त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी चाकु काढुन घेतला. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सुमित साजन जाधव वय ३५ वर्षे रा. करबला मस्जिदजवळ, गणेशपेठ, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु किंमती ३००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे गणेशपेठ येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे कोतवाली :—** दिनांक ०१.०८.२०२६ चे ०३.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कोतवाली हद्दीत, केळीबाग रोड, त्रिवेणी मेन्स शोरुमसमोर, महाल येथे अनोळखी पुरूष वय अंदाजे ६० वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे कोतवाली येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे कोतवाली येथे पोउपनि. महेश जगताप यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** सौ. भागेश्वरी धमेंद्र बागडे, वय ३० वर्षे, रा. प्लॉट क्र. ७६, मंगलदीप नगर—२, हुडकेश्वर, नागपूर हया दिनांक १६.०७.२०२६ चे १९.०० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची—५ फुट १ इंच, केस—काळे लांब, अंगात—लाल रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** सौ. जयश्री संदीप गाडगे, वय ४७ वर्षे, रा. प्लॉट क्र. ६१, सौभाग्य नगर, हुडकेश्वर, नागपूर हया दिनांक २५.०७.२०२६ चे २३.४५ वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून

आल्या नाही. **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–लांब, बांधा–मजबुत, उंची–५ फुट ४ इंच, केस–काळे लांब, अंगात–जांभळया रंगाचा टॉप व कत्था जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.

**३) पोलीस ठाणे हुडकेश्वर :–** सौ. काजल अमरसिंग माझी, वय १९ वर्षे, रा. प्लॉट क्र. ३३, शिल्पकार नगर, सिदधेश्वरी झोपडपट्‌टी, हुडकेश्वर, नागपूर हया दिनांक २७.०७.२०२६ चे १४.०० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्‌दीतील राहते घरून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–लांब, बांधा–सडपातळ, उंची–५ फुट ५ इंच, केस–काळे लांब, भाषा– हिंदी बोलतात.


सौ. भागेश्वरी


सौ. जयश्री


सौ. काजल

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. सहदिवाणी न्यायाधीश–क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, राजुरा. | ९००१९२/२००९ | कलम ३,७ जिवनावश्यक वस्तु अधिनियम | प्रकाश रविंद्र उर्फ राजेंद्र सहारे वय ३१ वर्ष रा. धंतोली, नागपूर. | १८.०८.२०२६ |
| २. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्र. ४, नागपुर. | ३०४००४८/१९९८ | कलम ३९२, ३४ भादंवि | १)संजय कन्हैयालाल वाळवानी रा. १/२२, रामबाग कॉलनी, इमामवाडा, नागपूर.<br>२) देवेंद्र संतोष अवस्थी रा. ३/७, रामबाग कॉलनी, इमामवाडा, नागपूर<br>३) जॉन जोसेफ रा. ५/१, रामबाग कॉलनी, इमामवाडा, नागपूर<br>४) अनिमेश कुमार सुरेश कुमार रा. १०/२२, रामबाग कॉलनी, इमामवाडा, नागपूर | ०४.०८.२०२६ |
| ३ | मा. १५ वे सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०२८८४/२००९ | कलम ३२४, ३४ भांदवि | १) सोनपाल रामदास राजपुत वय ३२ वर्ष<br>२) खुशाल उर्फ कालु रामदास राजपुत वय २५ वर्ष | ११.०८.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | दोन्ही रा. प्लॉट क्र. १७३, धनलक्ष्मी सोसायटी, जय अंबेनगर, कळमणा, नागपूर. | |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**